# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** नागपूर महानगरपालिका केन्द्र शासनाचे निर्देशानुसार अमृत २.० योजना
**{सार्व.आरो.अभि.विभाग}** राबविणार आहे. शासनाच्या निर्देशानुसार नागपूर महानगरपालिकेने अमृत २.० योजनेअंतर्गत नागपूर शहरातील खालील तलावांचे

१) नाईक तलाव
२) लेंडी तलाव
३) पोलीस लाईन टाकळी तलाव
४) बिनाकी मंगळवारी तलाव

पुनरुज्जिवन प्रकल्प अहवाल शासनाकडे अमृत २.० योजनेअंतर्गत मंजूरीस्तव व निधी वितरीत करण्याकरीता सादर करण्यात आले आहे. अमृत २.० योजनेअंतर्गत केन्द्र शासन ३३%, राज्य शासन १७% व म.न.पा.चा ५०% हिस्सा आहे. केन्द्र शासनाच्या अमृत २.० योजनेअंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची संमती / हमी अंतर्गत खालील विषयास मंजूरी देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

अ. सदर प्रकल्पास शिखर समितीने मंजुरी दिलेल्या किंमती व्यतिरिक्त प्रकल्पाच्या भाववाढ व अतिरिक्त खर्चास (देखभाल व दुरुस्ती खर्चासह) संमती प्रदान करणे.

ब. शासनाच्या निर्देशानुसार अमृत २.० अंतर्गत उपरोक्त प्रकल्पांकरीता शासनाने मंजूरी दिलेल्या प्रकल्प राशीवर नागपूर महानगरपालिकेस स्वहिस्साचा निधी म.न.पा. निधीतून खर्च करण्यास संमती प्रदान करणे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 107/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 06/10/2022**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता (पर्यावरण), सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग, यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिका केन्द्र शासनाचे निर्देशानुसार अमृत २.० योजना राबविणार आहे. शासनाच्या निर्देशानुसार नागपूर महानगरपालिकेने अमृत २.० योजनेअंतर्गत नागपूर शहरातील खालील तलावांचे

१) नाईक तलाव
२) लेंडी तलाव
३) पोलीस लाईन टाकळी तलाव
४) बिनाकी मंगळवारी तलाव

पुनरुज्जिवन प्रकल्प अहवाल शासनाकडे अमृत २.० योजनेअंतर्गत मंजूरीस्तव व निधी वितरीत करण्याकरीता सादर करण्यात आले आहे. अमृत २.० योजनेअंतर्गत केन्द्र शासन ३३%, राज्य शासन १७% व

म.न.पा.चा ५०% हिस्सा आहे. केन्द्र शासनाच्या अमृत २.० योजनेअंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची संमती / हमी अंतर्गत खालील विषयास मंजूरी देण्याचा प्रश्न विचारात घेऊन,

अ. सदर प्रकल्पास शिखर समितीने मंजुरी दिलेल्या किंमती व्यतिरिक्त प्रकल्पाच्या भाववाढ व अतिरिक्त खर्चास (देखभाल व दुरुस्ती खर्चासह) संमती प्रदान करणे.

ब. शासनाच्या निर्देशानुसार अमृत २.० अंतर्गत उपरोक्त प्रकल्पांकरीता शासनाने मंजूरी दिलेल्या प्रकल्प राशीवर नागपूर महानगरपालिकेस स्वहिस्साचा निधी म.न.पा. निधीतून खर्च करण्यास संमती प्रदान करणे.

उपरोक्त प्रस्तावास मान्यात प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**